लोकमत

# संकुचित वृत्तीमुळे एकात्मता धोक्यात!

## न्यायमूर्ती हेमंत गोखले । शिवाजी विद्यापीठात हमीद दलवाई चर्चासत्राचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जातिधर्माच्या नावावर केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात संकुचितपणा वाढत चालला आहे. देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने ही अत्यंत धोकादायक बाब आहे, अशी चिंता निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले यांनी व्यक्त केली. अल्पसंख्याकांमध्ये भीतीचे वातावरण असून, जगण्यापेक्षा मोठे होत चाललेल्या धर्माच्या प्रश्नांचा देशाच्या प्रगतीवर गंभीर परिणाम होणार असल्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या 'हमीद दलवाई : साहित्य व समाजकार्य' या विषयावरील चर्चासत्राचा समारोप शनिवारी गोखले यांच्या मार्गदर्शनाने झाला. साहित्यिक सदानंद मोरे, राजन गवस, विनोद शिरसाठ, विनय हर्डीकर, रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित होते.

गोखले म्हणाले, दलवाई यांचे साहित्य आणि समाजकार्य पाहिले की त्यात कुठलेही द्वंद्व दिसत नाही. राजकारण आणि समाजकारण पाहतच मोठे झालेल्या दलवाई यांच्या काळात जितकी असुरक्षितता मुस्लिम समाजात नव्हती, त्याच्या कितीतरी पटींनी ती आता दिसत आहे. मुस्लिम आणि हिंदू या दोन्ही धर्मांमध्ये वेगवेगळ्या पद्धतींनी अंधश्रद्धा व गैरसमज पसरविले जात आहेत.

सदानंद मोरे म्हणाले, वैदिक धर्मातील चिकित्सा मुस्लिम धर्मात दिसत नसल्याने आजही दलवाई यांच्यासारख्या समाजसुधारकाची समाजाला गरज वाटते. त्यांनी नेहमीच स्वकियांविरोधात टोकाचा संघर्ष करीत एकाकीपणा अनुभवला. ते आजही जागतिक पटलावर मुस्लिम सुधारणावाद्यांचे प्रेरणास्थान आहेत; पण त्यांच्या वाट्याला कट्टर मुस्लिमांकडून द्वेष, तर कट्टर हिंदुत्ववाद्यांकडून सहानुभूती अशा दोन टोकाच्या भूमिका आल्या.

### विद्यापीठात दलवाई अध्यासन केंद्र व्हावे

हमीद दलवाई यांचे साहित्य आणि सामाजिक कार्य हे काळाच्याही पुढचे होते. त्यांच्या जीवन व साहित्यावर व्यापक चर्चासत्र भरवून शिवाजी विद्यापीठाने पुरोगामी व सुधारणावादी विचारांना कायम बळ दिले जात असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित केले. आता दलवाई यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ यांनी केले. साहित्यिक सदानंद मोरे व निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले यांनीही तशीच अपेक्षा व्यक्त केली.

### हिंदुत्ववाद्यांच्या इशाऱ्यानंतर पोलीस बंदोबस्त

विद्यापीठात सुरु असलेल्या या चर्चासत्राच्या समारोपादिवशी हिंदुत्ववादी संघटनांनी कार्यक्रम उधळण्याचा इशारा दिल्याने शनिवारी तणावाचे वातावरण होते. तातडीने पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. सभागृहाच्या आत व बाहेर पोलिसांचा पहारा ठेवण्यात आला; पण आंदोलक फिरकले नसल्याने चर्चासत्र निर्विघ्नपणे पार पडले.

### दलवाई आजच्या पिढीने अभ्यासावेत

समारोपाच्या पहिल्या सत्रात 'दलवाईंच्या लेखनाचे अनुवाद व नव्या पिढीचे मनोगत' यावर चर्चासत्र झाले. गौरी पटवर्धन व दीपाली अवकाळे यांनी दलवाई यांच्या साहित्याचे अनुवाद करताना येणारे अनुभव कथन केले. नव्या पिढीचे मनोगत समीर शेख, हिना कौसरखान, अझरुद्दीन पटेल यांनी मांडले. दलवाई हे आजच्या पिढीने अभ्यासावेत, अंगीकारावेत असे व्यक्तिमत्त्व असल्याच्या भावना त्यांनी मांडल्या. अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्राचार्य सुनीलकुमार लवटे यांनी दलवाईंचा विचार मुस्लिम म्हणून न करता 'मानवतावादी भारतीय' म्हणून करणे हीच त्यांच्या कार्याला पोहोचपावती ठरेल, असे सांगितले.

# ‘दलवाई सामाजिक बदलाचे दूत’

अमित गद्रे




विद्यापीठात हमीद दलवाईंचे साहित्य आणि समाजकार्य विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, न्या. हेमंत गोखले यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य सुनीलकुमार लवटे, राजन गवस, विनोद शिरसाठ, विनय हर्डीकर उपस्थित होते.

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

‘सामाजिक सुधारणेचे बीज रुजावे यासाठी हमीद दलवाई यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. सामाजिक इतिहासाचे नेमके भान आणि समाजसुधारणेची प्रागतिक दृष्टी त्यांच्याकडे होती. खऱ्याअर्थाने ते सामाजिक बदलाच्या परंपरेचे दूत होते,’ असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने आयोजित ‘हमीद दलवाई यांचे साहित्य आणि समाजकार्य’ या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी बोलत होते. वि. स. खांडेकर भाषा भवनात परिषद झाली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य सुनीलकुमार लवटे होते.

डॉ. मोरे म्हणाले, ‘१९९० नंतरच्या बदललेल्या आर्थिक आणि सामाजिक बदलाच्या पार्श्वभूमीवर जागतिक इस्लामिक विश्वात दलवाईंचे विचार आणि कार्य समाजाला पथदर्शक ठरणारे आहेत. चिकित्सक विचार करून समाजात सुधारणा आणि परिवर्तन आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्वतःची चिकित्सा करताना दलवाई यांचे विचार मार्गदर्शक ठरतात. त्यांचे लोकोत्तर कार्य प्रखर सामाजिक जाणिवेतून लोकांपुढे आणणे गरजेचे आहे. ते फक्त एक व्यक्ती नव्हते, तर विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. एक सर्वश्रेष्ठ प्रबोधनकार म्हणून त्यांचे अस्तित्व कायम राहील. त्यांनी दिलेला उदारमतवादी विचारांचा लढा नवीन पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरणारा आहे. अज्ञानाच्या जोपासनेची आणि अन्यायाची जाण त्यांना होती. यशापयशाची चिंता न करता त्यांनी आपले कार्य नेटाने सुरू ठेवले.’

न्या. हेमंत गोखले म्हणाले, ‘जगभरात धर्म आणि जातीच्या नावावर संकुचितपणा वाढत आहे. देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने हे धोकादायक आहे. त्यामुळे देशातील अल्पसंख्याकांमध्ये भीतीचे वातावरण असून, जगण्यापेक्षा धर्मांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जात आहे.’

समारोपाच्या पहिल्या सत्रात दलवाई यांच्या लेखनाचे अनुवाद व नव्या पिढीचे मनोगत यावर चर्चासत्र झाले. गौरी पटवर्धन व दीपाली अवकाळे यांनी दलवाईंच्या साहित्याचे अनुवाद करताना येणारे अनुभव कथन केले. नव्या पिढीचे मनोगत समीर शेख, हिना कौसर खान, अझरुद्दीन पटेल यांनी मांडले. याप्रसंगी साहित्यिक राजन गवस, विनोद शिरसाठ, विनय हर्डीकर, रणधीर शिंदे प्रमुख उपस्थित होते.

# उल्का वर्षाव पाहण्याचा विद्यार्थ्यांनी घेतला अनुभव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक व नागरिकांनी १४ डिसेंबरच्या रात्री नेत्रदीपक असा उल्का वर्षाव पाहण्याचा अनुभव घेतला.

उल्कापात हा पृथ्वी जेव्हा धूमकेतूच्या पट्ट्यातून जाते तेव्हा दिसतो; परंतु मिथुन राशीतून होणारा हा उल्का वर्षाव धूमकेतूमुळे नसून ३२०० फेथॉन या लघुग्रहामुळे होणारा उल्का वर्षाव आहे. हा लघुग्रह मंगळ आणि गुरू ग्रहांच्या कक्षांच्या दरम्यानच्या लघुग्रहांच्या पट्ट्यातील एक असा लघुग्रह आहे. या लघुग्रहापासून धुळीचे कण निर्माण होतात आणि त्याच्यातून पृथ्वी भ्रमण करते. दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये मिथुन राशीतून उल्का वर्षाव पाहता येतो. दि. ४ डिसेंबर ते १७ डिसेंबरपर्यंत मिथुन राशीतून उल्का वर्षाव होणार आहे. मिथुन राशीतून होणारा उल्का वर्षाव कोणत्याही प्रकारच्या उपकरणांशिवाय साध्या डोळ्यांनी पाहता आला. सूर्य मावळल्यापासून ते पहाटे ४.३० पर्यंत मिथुन राशीतून होणारा उल्का वर्षाव पाहण्यात आला, अशी माहिती अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापन विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजना आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या सहकार्याने आचार्य जगदिशचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून आपत्ती व्यवस्थापनातील ॲम्याटयूर रेडिओ या विषयावर कार्यशाळा झाली. कार्यशाळेमध्ये ॲम्याटयूर रेडिओच्या साहाय्याने संदेशवहन व आपत्ती व्यवस्थापनासाठी त्याचा उपयोग यांची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. डॉ. प्रमोद वासंबेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी निवृत्त सहायक जिल्हाधिकारी दत्ताजी देवगावकर, डॉ. जे. एस. गलगले यांनी मार्गदर्शन केले. अभिजित पवार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 DEC 2019
तरूण भारत


# हमीद दलवाई निधर्मी विचारांचा आवाज

## ज्येष्ठ विचारवंत विनय हर्डिकर यांचे प्रतिपादन : वि. स. खांडेकर सभागृहात चर्चासत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

हमीद दलवाई यांनी धर्मनिरपेक्ष माणूस म्हणून व्यक्तीला समाजात स्थान निर्माण करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. धर्म आणि शब्दांची चिकित्सा करणारे हमीद दलवाई हा निधर्मी विचारांचा आवाज होता, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत विनय हर्डिकर यांनी केले.

मराठी विभाग, साधना साप्ताहिक व पुणे येथील हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने वि. स. खांडेकर सभागृहातील आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणात ते बोलत होते. हमीद दलवाईंचे साहित्य आणि समाजकार्य हा या चर्चासत्राचा विषय होता. डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



कोल्हापूर : चर्चासत्रात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे. सोबत डॉ. राजन गवस, निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले, डॉ. रणधीर शिंदे आदि.

हर्डिकर पुढे म्हणाले, हमीद दलवाई हे कृतिशील विचारांची बांधिलकी जपणारे सुधारक होते. त्यांचे विचार आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विचार केल्यास ते नव्या समाजरचनेत दिशा देणारे आहेत.

डॉ. राजन गवस म्हणाले, निधर्मी पुरोगामी विचारांची सर्वत्र टिंगलटवाळी सुरू असून ते समाजासाठी घातक आहे. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. यावेळी राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सदानंद मोरे, डॉ. सुनीलकुमार लवटे, दशरथ पारेकर, वसंत भोसले उपस्थित होते.

### दलवाई यांचे विचार दिशादर्शक : सदानंद मोरे

हमीद दलवाई हे भारतातील सामाजिक बदल परंपरेचे दूत होते. समाज सुधारणेची जागतिक दृष्टी त्यांच्या विचारांत होती. १९९० नंतरच्या बदललेल्या आर्थिक, सामाजिक बदलाच्या पार्श्वभूमीवर आणि जागतिक इस्लामिक चर्चाविश्वात दलवाई यांचे विचार आणि कार्य समाजाला दिशा देणारे आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी केले. निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले म्हणाले, समाजकार्याचा वारसा, भारतीय एकात्मतेसाठी हमीद दलवाई यांचे साहित्य आवश्यक आहे. आजच्या भारतीय समाजाला दलवाईंचे कार्य दिशादर्शक ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.